सातारा जिल्ह्यातील कराड तहसीलमधील ग्रामीण वसाहतींचा अभ्यास : एक भौगोलिक विश्लेषण

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्याशाखे अंतर्गत भूगोल विषयातील
पीएच. डी. पदवी करिता सादर करण्यात
येणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

: संशोधक :

श्री चव्हाण गंगाराम सर्जेराव
(एम. ए., सेट)

: मार्गदर्शक :

प्रा. डॉ. राठोड विष्णुदास राम
भूगोल प्रमुख
वसंतराव नाईक महाविद्यालय, नांदेड

: भूगोल संशोधन केंद्र :

स्कूल ऑफ अर्थ सायन्स,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ऑगस्ट २०२१

स्वामी रामानंद मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

संशोधकाचे नाव : श्री चव्हाण गंगाराम सर्जेराव

मोबाईल नंबर : 866862130

ई-मेल : chavangangaram30@gmail.com

मार्गदर्शकाचे नाव : प्रा. डॉ. राठोड विष्णूदास राम

मोबाईल नंबर : 9423139319

ईमेल : drvrrathod@gmail.com

विषयाचे नाव : भूगोल

संशोधन विषयाचे शीर्षक : सातारा जिल्ह्यातील कराड तहसीलमधील ग्रामीण वसाहतींचा अभ्यास : एक भौगोलिक विश्लेषण

सातारा जिल्ह्यातील कराड तहसीलमधील ग्रामीण वसाहतींचा अभ्यास : एक भौगोलिक विश्लेषण

प्रस्तावना :

भारत हा शेतीप्रधान देश आहे. भारत देशात जवळपास 70 टक्के लोक शेती हा प्राथमिक व्यवसाय करतात. त्यामुळे जास्तीत जास्त लोक हे खेड्यांमध्ये राहतात. भारत देशाला खेड्यांचा देश असे म्हणतात. सृष्टीमध्ये मानव हा अतिशय बुद्धिमान आहे.. त्यामुळे सर्व सजीव सृष्टीमध्ये मानवाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. मानवाने आपल्या सभोवताली आढळणाऱ्या पर्यावरणाचा मोठ्या कल्पकतेने वापर करून आपला विकास करण्याचा प्रयत्न केला असल्याचे आढळते. अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. गरजा पूर्ण करण्यासाठी मानव पर्यावरणाचा वापर करून घेतो आहे. त्यामधील निवारा ही मूलभूत गरज पूर्ण करण्याकरिता मानव पर्यावरणाचा आधार घेतो. पर्यावरणामध्ये वस्ती करून राहतो. वस्ती म्हणजेच वसाहत आणि ही संज्ञा सजीवांच्या निवासस्थानाचा बोध करून देणारी संज्ञा आहे. भूगोल विषयाच्या मुख्य दोन शाखा असून त्याचे प्राकृतिक भूगोल व मानवी भूगोल असे दोन प्रकार पडतात. ज्या शाखांचा संबंध प्रत्यक्ष पर्यावरणाशी असतो त्या विद्या शाखांना प्राकृतिक भूगोल म्हणतात. ज्या विद्याशाखांचा प्रत्यक्ष संबंध मानवाशी असतो. त्या विद्या शाखांना मानवी भूगोल म्हणतात. वसाहत भूगोल ही मानवी भूगोलाची शाखा आहे. ग्रामीण वसाहतींवरती भूरचना, हवामान, पाणीपुरवठा, जमीन प्रकार, वाहतुकीचे मार्ग इत्यादी घटकांचा प्रभाव पडतो. निरनिराळ्या भागात ग्रामीण वसाहती भिन्नभिन्न आढळतात. २०११ च्या जनगणनेनुसार असे आढळून आले की, एकूण मानवी लोकसंख्येपैकी भारत देशात २४.५८ टक्के तर महाराष्ट्र राज्यात ४५.२२ टक्के लोकसंख्या शहरी भागात आहे. राज्यात ५४.७७ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. म्हणून भारतात मानवी वस्तीचे उच्च प्रमाण ग्रामीण भागात असलेले आढळते. निवारा हे मानवाची अत्यावश्यक गरज असल्याने मानव वेगवेगळ्या प्रकारची घरांची रचना करून वसाहत निर्माण करू लागला. प्राथमिक अवस्थेत मानव सतत भटकत होता. त्याचे जीवन शिकार करणे, कंदमुळे गोळा करणे, मासेमारी करणे याच्याशी निगडीत होते. कालांतराने कुटुंब, टोळी, जमात आणि सामुदायिक जीवनाचा विकास होऊ लागल्यावर तो काही ठिकाणी वस्ती करू लागला. त्यातूनच वसाहत ही संकल्पना उदयाला आली. त्यानंतर त्यातून ग्रामीण वसाहती व नागरी वसाहत या संकल्पनांनी जन्म घेतला. ग्रामीण वसाहतींचा विकास व वाढ झाल्यानंतर नागरी वसाहतींची निर्मिती होते त्यामुळे ग्रामीण वसाहती मानवी संस्कृतीचा वारसा जपतात. त्यामुळे वसाहतींचा

अभ्यास हा मानवी समाजाच्या सामाजिक, आर्थिक, भौगोलिक, पूर्ततेसाठी गरजांचा स्थूल, कालसापेक्ष अभ्यास आहे. म्हणून संशोधनासाठी “कराड तालुक्यातील ग्रामीण वसाहतीचा अभ्यास : एक भौगोलिक विश्लेषण” हा विषय निवडला आहे व या विषयाचा सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

ग्रामीण वसाहतींचा अर्थ व व्याख्या :

अनेक लोकांनी वास्तव्यासाठी निर्माण केलेली घरांची रचना म्हणजे वसाहत होय. किंवा घरांचा समुदाय म्हणजे वसाहत होय असेही म्हणता येईल. अन्न, वस्त्र, निवारा, या मूलभूत गरजा पैकी ‘निवारा’ ही गरज वसाहतीशी संबंधित आहे. वसाहती या मराठी शब्दाला इंग्रजी भाषेमध्ये सेटलमेंट हा शब्द आहे. सेटलमेंट हा शब्द लॅटिन भाषेतून आला आहे. ग्रामीण वसाहतीमधील लोक प्राथमिक व्यवसायामध्ये गुंतलेले असतात. उदाहरणार्थ शेती, खाणकाम, लाकूडतोड, मासेमारी इत्यादी. ग्रामीण वसाहतीमधील लोक नागरी वसाहतींमधील लोकांच्या गरजा पूर्ण करतात. थोडक्यात नागरी वसाहती या पूर्णपणे ग्रामीण वसाहती वरती अवलंबून असतात. “ज्या वसाहतींमधील लोक प्राथमिक व्यवसायाशी संबंधित असतात किंवा ज्या वसाहतीमध्ये लोकांचा प्रत्यक्ष प्राथमिक व्यवसायाची संबंध असतो त्या वसाहतींना ग्रामीण वसाहती म्हणता येईल.”

भूगोल विषयामध्ये वसाहत ही व्यापक संकल्पना आहे. वसाहतीच्या व्याख्येवरून आपणास वसाहतीचा अर्थ समजण्यास मदत होते. अनेक भूगोल तज्ञांनी वसाहतीच्या व्याख्या केल्या आहेत. त्यांचा आढावा पुढीलप्रमाणे:

“मानवी समाजात आवश्यक असणाऱ्या सामाजिक व भौगोलिक घटकांची शेतवाड्या, गृहसमूह, नगरे इत्यादी अभीक्षेत्रीय व्यवस्था म्हणजे वसाहत होय.”

-डिकिन्सन

“स्थायी स्वरूपात अधिकृत कोणतेही मानवी निवासस्थान वसाहत असते. एकाकी निवासस्थानाला सुद्धा अधिवास म्हटले जाते. वसाहत हा शब्द एका वाडी पासून ते सन्नगर पर्यंतचा गृहाला आणि घरांच्या समूहाला स्पष्ट करतो.”

-स्मिथ

“वसाहत म्हणजे घराने व्यापलेले क्षेत्र की, ज्यामध्ये लोकसंख्या समूह असतो. त्यामध्ये वेगवेगळ्या कुटुंबाना वेगवेगळी घरे उपलब्ध असतात यामध्ये सुविधा उपलब्ध असतात.”

-त्रिवाथी जी. टी.

“वसाहत मानवाचे संघटन प्रदर्शित करते, त्यामध्ये ते निवास करतात व त्याचा अन्य प्रकारे उपयोग करतात.”

- सिंह आर. एल.

“मानवी वस्त्यांच्या विविध अंगे व भौगोलिक घटकांचे त्यांच्याशी असणारे नाते विश्लेषण करणारी ज्ञानशाखा म्हणजे वसाहत होय.”

वसाहत भूगोल म्हणजे मानवी वस्त्यांच्यावरती परिणाम करणाऱ्या भौगोलिक घटकांच्या पारस्परिक संबंधाची तर्कशुद्ध उकल करणारे शास्त्र होय.

अभ्यास क्षेत्र:

सातारा जिल्ह्यामध्ये अकरा तालुके आहेत. त्यामध्ये सातारा, पाटण, कराड, दहिवडी, कोरेगाव, फलटण, खंडाळा, जावळी, वाई, खटाव, महाबळेश्वर यांचा समावेश होतो. प्रस्तुत संशोधनात्मक विषयासाठी वरील पैकी कराड तालुक्याची निवड केली आहे. कराड तालुका सातारा जिल्ह्याच्या दक्षिण दिशेला आहे. सन १८८५ मध्ये या शहराचा स्वतंत्र कारभार सुरू झाला. महाबळेश्वर या थंड हवेच्या ठिकाणी उगम पावलेल्या कोयना आणि कृष्णा नद्यांचा संगम कराड येथे झाला आहे. त्या संगमास ‘प्रीतीसंगम’ असे संबोधतात. कराड शहरास यशवंत नगरी म्हणून ओळखली जाते. कराड शहराचा अक्षवृत्तीय विस्तार १७.२८० उत्तर ते १७.२३० उत्तर असा आहे. तर रेखावृत्तीय विस्तार ७४.२० पूर्व रेखावृत्त ते ७४.२० रेखावृत्त आहे. समुद्रसपाटीपासूनची उंची ५६६ मीटर (१८५६ फुट) आढळते. कराड शहर हे सातारा जिल्ह्यातील उपजिल्हा प्रशासकीय शाखा आहे. कराड तहसील मध्ये एकूण २१७ खेडी तर ५ शहरी भाग आढळतात. कराड तालुक्यामध्ये उंब्रज हे सर्वाधिक लोकसंख्येचे गाव तर ब्रिटिश शिरवडे सर्वात कमी लोकसंख्येचे गाव आहे. कराड तालुक्याची एकूण लोकसंख्या ५८४०८५ असल्याचे जनगणनेनुसार समजते २०११ च्या जनगणनेनुसार कराड तालुक्यामध्ये १२४९२५ कुटुंब आहेत तसेच एकूण लोकसंख्येपैकी जवळपास ४८६५४२ लोकसंख्या ग्रामीण भागात राहते तर ९७५४२ लोकसंख्या शहरी भागात राहते.

थोडक्यात एकूण लोकसंख्येपैकी १६.७ टक्के लोकसंख्या शहरी भागात तर ८३.८ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते.

उद्दिष्टे :

सातारा जिल्ह्यात यशवंत नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कराड तालुक्याचे ऐतिहासिक महत्त्व खूप आहे. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांची कर्मभुमीत पुरातन आगाशिव डोंगर रंगातील लेण्यासठी प्रसिद्ध. कृष्णा-कोयना नद्यांचा संगम असणारा प्रीतिसंगम अशा विविध गोष्टींसाठी प्रसिद्ध असणाऱ्या कराड तालुक्यातील ग्रामीण वसाहत यांचा अभ्यास प्रस्तुत शोधप्रबंध केलेला आहे. या विषयाला अनुसरून विविध उद्दिष्टे लिहिता येतील ते खालील प्रमाणे ;

१. कराड तालुक्यातील ग्रामीण वसाहतींचे सध्याचे स्वरूप व सध्याची परिस्थिती यांचा अभ्यास करणे.
२. कराड तालुक्यातील ग्रामीण वसाहती प्रादेशिक वितरण व वैशिष्ट्ये यांचा सखोल अभ्यास करणे.
३. कराड तालुक्यातील ग्रामीण वसाहतींचा निर्मिती वरती व वाढीवरही परिणाम करणाऱ्या नैसर्गिक घटकांचा आढावा घेणे
४. ग्रामीण वसाहत निर्मितीमध्ये ऐतिहासिक आर्थिक सामाजिक सांस्कृतिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
५. कराड तहसील मधील ग्रामीण लोकसंख्येची वैशिष्ट्य ग्रामीण भागातील चा आकार व रचना यांचा अभ्यास करणे.
६. कराड शहरांमधील कराड सेवाकेंद्रे वं इतर सेवा सुविधांचे मूल्यमापन करणे.
७. ग्रामीण वसाहतीमधील घरे व त्यांसाठी वापरल्या जाणाऱ्या बांधकाम साहित्याचा अभ्यास करणे.
८. ग्रामीण वसाहतीमधील वाढ व त्यांच्या हालचालींचा अभ्यास करणे.

गृहीतके:

१. कराड तालुक्यातील ग्रामीण वसाहतींचे आकार व वितरण हे त्या त्या प्रदेशानुसार भिन्न असते.
२. आर्थिक क्रिया हा घटक ग्रामीण वसाहतीवर ते परिणाम करत असतो.
३. ग्रामीण वसाहतीमध्ये ग्रामीण सेवा केंद्र व इतर सेवा सुविधा केंद्र यांचे वितरण असमान आढळते.
४. ज्या प्रदेशांमध्ये नैसर्गिक संसाधने जास्त प्रमाणात आढळतात तेथे ग्रामीण वसाहती जास्त प्रमाणात आढळतात.

माहितीचे संकलन व संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी विविध भौगोलिक परिमाने तसेच द्वितीय स्त्रोत यांचा वापर करून माहितीचे संकलन केले जाणार आहे. त्याच बरोबर जिल्हा व तालुका जनगणना अहवाल

(१९९१, २००१, २०११) यांचा विचार करण्यात येईल. त्याचबरोबर रस्ते, वाहतूक, शेत्रफळ, शेती, लोकसंख्या इत्यादी तसेच जिल्हा स्थलदर्शक नकाशे त्याचबरोबर प्रश्नावली तयार करून नमुना निवड चाचणीद्वारे माहिती संकलन केले जाणार आहे. विषयाचे संदर्भ ग्रंथ, प्रकाशित पुस्तके, शोधप्रबंध, शोधपत्रिका, मासिके, वर्तमानपत्रे, अप्रकाशित साहित्य त्याचबरोबर इंटरनेट, काही संगणकीय सॉफ्टवेअरचा वापर करून माहिती संकलन केले जाणार आहे.

सदर संशोधनाकरिता प्राथमिक व द्वितीयक स्त्रोतद्वारे माहितीचे संकलन केले असून यामध्ये वॉल्टर ख्रिस्तलर सिद्धांत, ग्रामीण वसाहतीमधील अंतर काढण्याचे सूत्र, ग्रामीण वसाहतीमधील सरासरी लोकसंख्या काढण्याचे सूत्र, RNची किंमत काढण्याचे सूत्र, विविध फोटोग्राफिक तंत्रे, नकाशे, सांख्यिकी पद्धती, (मध्यमान, बहुलक, मध्यमा) ही परिमाणे, जवळील शेजारी विश्लेषण अशा विविध पद्धती व तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. तसेच प्रश्नावली तयार करून प्रत्यक्ष भेट देऊन व माहितीचे संकलित केली जाणार असून ती द्वितीयक माहिती संकलन ग्रामपंचायत व पंचायत समिती, जिल्हा परिषद, ग्रामसेवक, जनगणना अहवाल इत्यादी ठिकाणाहून माहिती संकलन केले जाणार आहे.

साहित्य पुनरावलोकन:

साहित्य पुनरावलोकन त्याला महत्वाचे स्थान असते कारण त्यामुळे संशोधनास योग्य दिशा मिळते. साहित्य पुनरावलोकनच्या माध्यमातून विषयाची ओळख व योग्य स्वरूप समजते. स्टबे या शास्त्रज्ञांनी प्रथम वसाहती या विषयावर लेखन केले.

१. **सावंत एस. बी. :** यांनी पुणे जिल्हयातील खडकी गावाचा विकास या शोधप्रबंध यामध्ये त्यांनी खडकी गावाच्या भौगोलिक स्थिती विश्लेषण करून या गावातील सामाजिक व आर्थिक घटकांची कारणमीमांसा केली आहे.

२. **कुंभारे ए. आर. :** यांनी नीरा नदीच्या खोऱ्यातील ग्रामीण वसाहत अभ्यास या शोधप्रबंध यामध्ये त्यांनी नीरा नदी खोऱ्यातील वसाहती स्थान प्रकार स्वरूप वितरण या घटकांचा सखोल अभ्यास केला.

३. **अंकुरे के. बी.:** मराठवाड्यातील ग्रामीण व नागरी वस्त्या यांचा सखोल अभ्यास केला आहे त्यामध्ये ग्रामीण व नागरी वसाहत स्वरूप वितरण कसे कारणीभूत आहेत याचे विवेचन केले आहे.

४. **सिन्हा एन. पी.:** त्यांनी छोटा नागपूर पठारावरून वसाहत अभ्यास केला आहे

५. **गौतम भट्टाचार्य :** Studied development problem of rural settlement in a coastal area of the bhat region of gujrat या शोधप्रबंध मध्ये त्यांनी गुजरात राज्यातील किनारी भागातील वसाहती व त्यांच्या संदर्भात असणाऱ्या अडचणींचा अभ्यास केला आहे.

६. **पवार एन.बी. :** a Geographical theses of rural habitat in beed district शोध प्रमाणामध्ये त्यांनी बीड जिल्ह्यातील ग्रामीण वसाहतीचा भौगोलिक अभ्यास सखोल पद्धतीने केलेले आहे त्यामध्ये भौगोलिक सांस्कृतिक घटक कशा प्रकारे वसाहतीवर ती परिणाम करतात याचाही अभ्यास करण्यात आला

७. **प्रसाद ए.:** Rural settelment of Chatanagpur या शोधप्रबंध यामध्ये व स्वतंत्र दिवस व त्यांचे प्रकार त्यांचे वर्गीकरण प्रश्न भावनिक सामाजिक घटकांचा अभ्यासक्रमात सखोल पद्धतीने केला आहे.

८. **पवार एन. एन. :** यांनी त्यांनी ग्रामीण व भौगोलिक अभ्यास केला आहे. त्यांनी भौगोलिक व सांस्कृतिक घटक कशाप्रकारे वसाहतींच्या रचनेवर ते परिणाम करतात याचे विवेचन केले आहे

९. **विश्वनाथ :** यांनी प्रस्तुत शोधनिबंधामध्ये तमिळनाडू राज्यातील डिलीटेक एक जिल्ह्यातील ग्रामीण वसाहतींचा अभ्यास केला तसेच त्या प्रदेशातील ग्रामीण वसाहतींच्या प्रारूपांचा मृदेशी असणारे संबंध स्पष्ट केला.

१०. **वराट :** यांनी प्रवरा नदी खोऱ्यातील ग्रामीण व संज्ञा उत्क्रांतीचे भौगोलिक विश्लेषण केले आहे तसेच भौगोलिक घटकांचा या प्रदेशातील वसतिस्थान, प्रकार, प्रारूपे, वितरण कसा परिणाम होतो. याचे विषयी करण्यात आले आहे.

११. **नागरगोजे ए. यु.:** उदगीर तालुक्यातील ग्रामीण वसाहत यांचा अभ्यास या शोध प्रबंधामध्ये उदगीर तालुक्यातील ग्रामीण वसाहती, प्रकार, प्रारूपे, वितरण याचा अभ्यास केला आहे तसे आकार, अंतर सेवाकेंद्र यांचाही सखोल अभ्यास केला.

१२. **सय्यद मौलाना मेहताब :** बिदर जिल्ह्यातील ग्रामीण वसाहतींचा अभ्यास केला.

१३. **चिमणगुंडे व्ही. एस.:** गंगाखेड तालुक्यातील ग्रामीण वसाहतींचे अभिक्षेत्रीय विश्लेषण, या शोधप्रबंधामध्ये वस्ती उत्क्रांती प्रकार, प्रारूपे, अंतर्गत रचना सेवाकेंद्रे, बांधकाम साहित्य यांचा सखोल अभ्यास केला आहे.

१४. **आव्हाड बालाजी चांदोजी:** आसना खोऱ्यातील ग्रामीण वसाहतींचा भौगोलिक अभ्यास केला आहे.

१५. **चित्ते अंगद किशनराव:** लातूर वं औसा तालुक्यातील ग्रामीण वसाहत अभ्यास या प्रांतांमध्ये ग्रामीण वसाहत, प्रकार, प्रमुख आकार, अंतर्गत रचना, सेवाकेंद्र यांचा अभ्यास केला.

१६. **केसकर एस. बी.:** या शोध प्रबंधामध्ये अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत जामखेड तालुक्यातील ग्रामीण वसाहतींच्या भौगोलिक अभ्यास करण्यात आला आहे.

१७. **लहाने बी. एस.** : या शोध प्रबंधामध्ये औसा व शिरूर अनंतपाळ तालुक्यातील ग्रामीण वसाहतींचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

१८. **शेंडगे बी. पी. :** प्रस्तुत शोधनिबंधामध्ये परभणी जिल्ह्यातील जिंतूर व पथारी तालुक्यातील ग्रामीण वसाहतींचा अभ्यास केला आहे. वसाहत निर्मिती व वसाहत वर्गीकरण या घटकांवर ती परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास केला आहे.

१९. **जाधव बी. एस. :** सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील ग्रामीण वसाहत यामध्ये अभ्यास केला आहे त्यामध्ये ग्रामीण व सत्र संस्थान प्रकारे वर्गीकरण मित्रांनी याचा अभ्यास केला आहे.

२०. **खराटे व्ही. बी. :** या शोधप्रबंधामध्ये पैनगंगा नदी खोऱ्यातील ग्रामीण वसाहत विवेचन केले आहे.

२१. **मुळे अंबादास मारोतीराव :** लातूर जिल्ह्यातील अहमदपूर व निलंगा तालुक्यातील ग्रामीण वासाहत प्रकार, अंतर्गत रचना, सेवाकेंद्रे यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

२२. **राठोड रोहिदास शरद :** यांनी नांदेड जिल्ह्यातील मुखेड देगलूर तालुक्यातील लोकसंख्या ग्रामीण वसाहत, प्रकार, प्रारूपे, सेवाकेंद्र, बांधकाम साहित्य यांचा सखोल अभ्यास केला आहे.

२३. **केंद्रे डी. एस. :** यांनी जालना जिल्ह्यातील ग्रामीण वसाहतींचा भौगोलिक अभ्यास केला आहे.

संशोधनाची प्रकरण रचना

प्रकरण पहिले: प्रस्तावना

या प्रकरणांमध्ये विषय संकल्पना, विषयी ओळख, वसाहत याची व्याख्या, अभ्यास क्षेत्राची निवड, प्रस्तुत विषयाची उद्दिष्टे, प्रस्तुत विषयाची गृहीतके, माहिती संकलन व संशोधन पद्धती, संशोधन आधारावर पुनरावलोकन, प्रकरण योजना इत्यादी अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण दुसरे: अभ्यास क्षेत्राची प्राकृतिक व सांस्कृतिक रचना

या प्रकरणांमध्ये अभ्यास क्षेत्र, तालुका निर्मिती, ऐतिहासिक पार्श्वभूमी, अभ्यासताना प्राकृतिक रचना, भूशास्त्रीय रचना, नद्या, हवामान, वनस्पती, लोकसंख्या घनता, लिंगगुणोत्तर, साक्षरता प्रमाण, ग्रामीण व वाहतूक दळणवळण, भूमी उपयोजन इत्यादी घटकांचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे: ग्रामीण वसाहत उत्क्रांती

या प्रकरणाचा अभ्यास करत असताना यामध्ये आपण ग्रामीण वसाहत निर्मिती अभ्यास करता येईल तसेच प्राचीन काळातील ग्रामीण वसाहती, मध्ययुगीन काळातील ग्रामीण वसाहत व अर्वाचीन काळातील ग्रामीण वसाहती यांचा अभ्यास करण्यात येईल तसेच ग्रामीण व त्यांच्या नावाचे भौगोलिक विश्लेषण व वितरणाचा अभ्यास केला जाईल

प्रकरण चौथे: अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण वसाहतींची वाढ व वितरण

या प्रकरणाचा अभ्यास करत असताना भूरचनेला अनुसरून ग्रामीण वसाहतींचे वितरण, शेती, दळणवळण, वाहतूक, रस्ते, सिंचन इत्यादी घटकांन अनुसरून वसाहतींचे वितरण लोकसंख्या गटानुसार वसाहतींचे वितरण ग्रामीण वसाहत वितरण वरती परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास केला जाणार आहेत

प्रकरण पाचवे : ग्रामीण वसाहतींचे प्रकार व प्रारूपे

या प्रकरणांमध्ये ग्रामीण वसाहत प्रकार ग्रामीण वसाहतींचे विविध प्रारूपे ग्रामीण वसाहतींवर झालेला परिणाम भौगोलिक व सांस्कृतिक घटकांचा परिणाम यांचा सखोल अभ्यास केला आहे,

प्रकरण सहावे : ग्रामीण लोकसंख्या, ग्रामीण वसाहत, अंतर्गत रचना आणि बांधकाम साहित्य

ग्रामीण वसाहतीमध्ये राहणारी लोकसंख्या, त्यांचे राहणीमान, आर्थिक परिस्थिती याचा अभ्यास करण्यात येणार आहे तसेच ग्रामीण वसाहतींचे अंतर्गत रचना कसे आहे, आर्थिक परिस्थिती कशी आहे त्यासाठी वापरले जाणारे बांधकाम साहित्य या सर्व घटकांचा विवेचनात्मक अभ्यास केला जाणार आहे. यासाठी सर्वेक्षण करून त्याच्या आधारे माहिती जमा केली जाणार आहे

प्रकरण सातवे : ग्रामीण वसाहतीमधील सेवाकेंद्रे

ग्रामीण वसाहतीमध्ये कोणकोणती सेवाकेंद्र असतात. त्यांचे वर्गीकरण, ग्रामीण सेवासुविधा क्षमता, त्यामध्ये प्राथमिक शिक्षण सुविधा, माध्यमिक शिक्षण सुविधा, आरोग्य केंद्र, बँक सुविधा, डाक कार्यालय, आठवडे बाजार ईतर आढळणारा सुविधांचा अभ्यास करण्यात येईल

प्रकरण आठवे : निष्कर्ष

या प्रकरणांमध्ये सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील ग्रामीण वसाहतीचा सखोल अभ्यास करून त्यावरून निघणारे निष्कर्ष अभ्यासातून समोर येणाऱ्या समस्या व त्यावर ती कोण कोणते उपाय करता येतील त्याचे नियोजन करण्यात येईल

अशा प्रकारे कराड तालुक्यातील ग्रामीण वसाहतींचा अभ्यास एक भौगोलिक विश्लेषण या पदासाठी वरील सात प्रकरणांच्या माध्यमातून अभ्यास करण्यात येईल.

संदर्भ ग्रंथ :

१. घारपुरे वि. त्र्य. (१९९९): वस्ती भूगोल, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर
२. प्रा. के. ए. खतीब (१९९७) वसाहती भूगोल, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
३. अहिरराव वा. र. (१९९७) अधिवास भूविज्ञान, निराली प्रकाशन, पुणे.
४. वरात टि. एम. (२००४) प्रवरा खोऱ्यातील ग्रामीण वस्त्यांची उत्क्रांती : एक भौगोलिक विश्लेषण
५. कुंभारे ए. पी. (१९९७) नीरा खोऱ्यातील ग्रामीण वस्त्यांचा अभ्यास,
६. सावंत एस. बी. (१९७८) पुणे नागरी भूगोल अभ्यास
७. कणबुरे के. बी. “मराठवाड्यातील नागरी व ग्रामीण वस्त्यांचा अभ्यास
८. Kumbhar A. P. (1998) ‘A Study of Rural Habitat in Nira Valley ‘ Ph. D. Thesis Shivaji University, Kolhapur
९. Dfr. Shailesh Wagh, Sidharth Sonawane (2017), Rural and Urban settlement geography, Atharav Publication, Pune
१०. Sawant S. B. (1978)”Poona’ A Study in Urban Geography
११. Sinha V. N. P. (1978) Chota Nagpur Ploteau: A Study in Settlement Geography , Ph.D. Thesis
१२. Dr. Mandal R. B. (1979) Introducation to Rural Settlement Concept publishing company , new dwlhi.

१३. Ali S. M. (1942) Population and settlement in Ghanghar plain : Indian Geography Journal
१४. चिमणगुंडे, व्ही. एस. (१९७२) गंगाखेड तालुक्यातील ग्रामीण वसाहतींचे अभिक्षेत्रीय विश्लेषण, पीएचडी प्रबंध
१५. चित्ते अंगद किशनराव (२०१६) लातूर, औसा तालुक्यातील ग्रामीण वसाहत अभ्यास, पीएचडी प्रबंध
१६. भारतीय जनगणना अहवाल (१९९१, २००१, २०११)
१७. भारतीय स्थलदर्शक नकाशे Census of India (2011) District Census handbook Satara, Maharashtra
१८. www.google.com

संशोधक

मार्गदर्शक

चव्हाण गंगाराम सर्जेराव

प्रा. डॉ. राठोड व्ही. आर.
भूगोल विभाग,
वसंतराव नाईक महाविद्यालय, नांदेड